महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत**
एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन इमारत,तळमजला,लेबर कॅम्प,
धारावी रोड, माटुंगा (पुर्व) मुंबई -४०० ०१९
दुरध्वनी क्र. ०२२-६९४२५००
ई-मेल -agmhrc@mahagenco.in वेबसाईट :- www.mahagenco.in

क्र.महानिर्मिती/उपमव्य.(मासं-सेप्र)/ No 08224 दिनांक: 16 SEP 2025

## सूचना

**विषय** :- महानिर्मिती जाहिरात क्र.०३/२०२५ अन्वये सुरक्षा संवर्गातील कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाची बुलढाणा केंद्रावरील शारीरिक क्षमता चाचणी (PET) आणि मनोविश्लेषण (Psychometric Test) चाचणी पुढे ढकलण्याबाबत.

**संदर्भ:**- १) महानिर्मिती जाहिरात क्र.०३/२०२५
२) महानिर्मिती सूचना क्र.५०१४ दि.०५.०६.२०२५
३) महानिर्मिती सूचना क्र.७२०४ दि.१२.०८.२०२५
४) महानिर्मिती सूचना क्र.७८४९ दि.०२.०९.२०२५
५) महानिर्मिती सूचना क्र.७९६४ दि.०९.०९.२०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन महानिर्मिती कंपनीमार्फत सरळसेवा भरती अंतर्गत जाहिरात क्र.०३/२०२५ अन्वये कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) यांची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता सरळसेवेची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. ऑनलाईन परीक्षेअंती शारीरिक क्षमता चाचणीसाठी (PET) तात्पुरते पात्र ठरत असलेल्या उमेदवारांची शारीरिक क्षमता चाचणी (PET) बाहयस्त्रोत भरती संस्थेमार्फत दि.०२ ते ०४ सप्टेंबर' २०२५ दरम्यान सातारा आणि बुलढाणा येथील केंद्रांवर आयोजीत करण्यात आली होती. सदरील परीक्षेसाठी तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या यादीसह सविस्तर सूचना संदर्भिय क्र.०३ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती.

वरील प्रकरणी दि.०१.०९.२०२५ रोजी बुलढाणा येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे सदरील केंद्रावरील शारीरिक क्षमता चाचणी (PET) परीक्षा संदर्भिय क्र.०४ वरील सूचनेनुसार पुढे ढकलण्यात आली होती व त्यानंतर बुलढाणा येथील शारीरिक क्षमता चाचणी (PET) दिनांक १६,१७ व १८ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. तसेच बुलढाणा व सातारा केंद्र येथील मनोविश्लेषण चाचणी (Psychometric Test) परीक्षा दि.१९ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती.

तथापि, दि.१६.०९.२०२५ रोजी बुलढाणा येथे सकाळी शारिरीक क्षमता चाचणी पूर्वी अचानक झालेल्या पावसामुळे तसेच तेथे उपस्थित मे.मेस्को यांचे अधिकारी, महानिर्मिती कंपनीचे समन्वयक आणि उमेदवार यांनी दिलेली माहिती यांचा एकत्रित विचार करुन दि.१६ ते १८ सप्टेंबर' २०२५ रोजी आयोजित शारीरिक क्षमता चाचणी (PET) स्थगित करण्यात येत आहे. परिणामी बुलढाणा व सातारा केंद्रावरील दि.१९ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित मनोविश्लेषण चाचणी (Psychometric Test) देखील सध्यस्थितीत स्थगित करण्यात येत आहे.

शारीरिक क्षमता चाचणी (PET) व मनोविश्लेषण चाचणी (Psychometric Test) बाबतची पुढील तारीख हवामान विभागाचा अंदाज व परीक्षा केंद्रावरील परिस्थिती याचा विचार करुन लवकरच जाहिरात करण्यात येईल. त्याबाबतची सूचना उमेदवारांच्या माहितीकरीता महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

16-09-25

(आनंद आबाराव कोंत)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)
महानिर्मिती